महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
कोकण परिमंडळ कार्यालय
ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

ग्राहक तक्रार क्र. ८५/२०११ दि.१९.०५.२०११

| | |
|---|---|
| श्री.सुधाकर वासुदेव पेठे.<br>मु.पो.परचुरी, ता.संगमेश्वर,<br>जि.रत्नागिरी | तक्रारदार ग्राहक |

विरुध्द

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता 'महावितरण'<br>विभागीय कार्यालय रत्नागिरी . | विरुध्द पक्षकार |
| फोरम उपस्थिती | १) श्री. डी. एस्. जामखेडकर, अध्यक्ष<br>२) श्री. व्ही.बी.जगताप , कार्यकारी अभियंता<br>३) श्री.एन्.ए.कुलकर्णी , सदस्य |
| ग्राहकाच्या वतीने | श्री.सुधाकर वासुदेव पेठे. |
| विरुध्द पक्षकाराच्या वतीने | श्री.ए.व्हि.महाजन (कार्यकारी अभियंता)<br>विभागीय कार्यालय रत्नागिरी<br>श्री.ए.ए.कागी (उपकार्यकारी अभियंता)<br>विभागीय कार्यालय रत्नागिरी<br>श्री. एस.एस.शिंदे (सहाय्यक अभियंता)<br>संगमेश्वर उपविभाग |

***महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :***

*ग्राहक श्री.सुधाकर वासुदेव पेठे, घर नं.१६७/१, मु.पो.परचुरी, ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी यांचा शेतघर वापरासाठी सिंगल फेज वीजजोडणी अर्ज प्रलंबित असल्याने तक्रार विहीत नमुन्यात दाखल झाली असून आवश्यक तो तपशिल जोडण्यात आलेला आहे. तक्रार प्राप्त होताच मंचाकडील पत्र क्र.९३५, दि२१.०५.२०११ च्या पत्रानुसार विभागीय कार्यालयाकडे स्पष्टीकरण मागण्यात आले असता विभागीय कार्यालयाने पत्र क्र.३४४५, दि.०७.०६.२०११ नुसार दि.१३ जून पर्यंत मुदतवाढ मागितली असता ती देण्यात आली आणि तक्रारीबाबतचे स्पष्टीकरण आवश्यक त्या तपशिलासह मंचाकडे दि.०९.०६.२०११ रोजी दाखल करण्यात आले. आयोगाच्या नियमावलीनुसार तक्रार प्रकरणात सुनावणीची नोटीस काढण्यात येवून दि.२९.०६.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली असता महावितरणने सुनावणीत तहकुबी करिता अर्ज दाखल केल्याने सुनावणी तहकूब करण्यात येवून, ती दि.०६.०७.२०११ रोजी ठेवण्यात आली असता उभयबाजुंनी उपस्थित राहून युक्तीवाद केला.*

*ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरुप असे की, मु.पो.परचुरी, ता.संगमेश्वर येथे असणा-या फळबाग शेतीमध्ये विहीर असून त्याकरीता कृषीपंप जोडणी अर्ज स्वतंत्रपणे दाखल केला असून शेतघर वापरासाठी सिंगल फेज वीज जोडणीकरीता अर्ज केला असता मंजुरी दि.२३.१२.२००९ रोजी प्राप्त होऊन कोटशन प्रमाणे रु.११००/- (रु.एक हजार एकशे मात्र) पावती क्र.९८९६३४६, दि.२२.०१.२०१० रोजी भरणा केली असून वेळोवेळी पाठपुरावाही केलेला आहे. तथापी वीज जोडणीची नेमकी स्थिती आणि जोडणी कश्यामुळे प्रलंबित आहे हे कळू शकलेले नाही. फळबाग शेतीसाठी सरकारच्या प्रोत्साहन योजना असून त्या योजने अंतर्गतच ही फळबागांची उभारणी केलेली आहे. कृषी पंपाची वीज जोडणी प्रलंबित असून त्यासोबत दिलेली शेतघर घरघुती वापराकरीता असणारी जोडणी सुद्धा अद्यापपर्यंत देण्यात आलेली नाही. संगमेश्वर कार्यालयाकडून ३१ मार्च पर्यंत सर्व कामे पुरी करण्यात येतील असेही सांगण्यात आले तथापी दोन वर्षाहून अधिक काळ जावूनही वीज जोडणीची अनिश्चितता अद्यापही तशीच आहे. मी जेष्ठ नागरीक असून सातत्याने होणारा भांडवली खर्च परवडणारा नाही. कृती मानकाच्या अपयशाबद्दल आणि एकूणच झालेल्या विलंबाबद्दल महावितरण जबाबदार असून आयोगाच्या नियमावलीनुसार मी जरी भरपाईस पात्र असलो तरी सुद्धा मी नुकसान भरपाई मागू इच्छित नाही पण वीज जोडणी मात्र तातडीने मिळावी एवढीच मागणी आहे.*

*तक्रार प्रकरणातील सुनावणी दि.०६.०७.२०११ रोजी घेण्यात आली असता उभयबाजुनी उपस्थित राहून युक्तीवाद केला. ग्राहकाने लेखी युक्तीवाद सादर करुन पुन्हा एकदा मागणी केली की, सदरहू वीज जोडणी तातडीने देण्यात यावी. महावितरणने आपल्या युक्तीवादात व्यवस्थापनाची एकूण कार्यपध्दती स्पष्ट करुन दि.०४.१२.२००९ रोजी सदर जोडणीच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळाल्याचे सांगून ग्राहकाकडून दि.२२.०१.२०१० रोजी कोटेशन प्रमाणे पैसे भरल्यानंतर ग्राहकाचे नाव संगमेश्वर उपविभागाच्या घरघुती प्रतिक्षा यादीत घेण्यात आले असून प्रतिक्षायादीत १७ वा क्रमांक आहे. ग्राहकाकडून अद्याप चाचणी अहवालही प्राप्त*

*झाला नसल्याचे महावितरणकडून नमुद करुन, कोकणातील नैसर्गिक मर्यादेमुळे कामाला विलंब लागत असल्याचे स्पष्ट केले आणि सद्याची स्थिती पाहता ऑक्टोबर २०११ पर्यंत वीज जोडणी देतो येणे शक्य असल्याचे नमुद केले. महावितरणने या तक्रार प्रकरणात लेखी आक्षेप नोंदविले असून नियमावली ६.२ ग्राहकाला लागू असून ग्राहकाने नियमावली ६.७ चे उल्लंघन केले असल्यामुळे मंच ही तक्रार घेऊ शकत नाही आणि ती फेटाळण्यात यावी अशी मागणी केली.*

*तक्रार प्रकरणात दाखल करण्यात आलेला तपशिल, उभयबाजुंनी केलेला युक्तीवाद आणि कायद्यातील तरतुदींचा विचार करता महावितरणकडून कायद्यातील तरतुदी आणि आयोगाच्या नियमावलीचा भंग झाल्याचे स्पष्ट होत असून ग्राहकाला वीज जोडणी बाबत वस्तुस्थिती कळविणे बंधनकारक असतानाही ती कळविण्यात आलेली नाही. ग्राहकाची कृषीपंप जोडणीसुद्धा प्रलंबित असून शेतघराकरीता मागण्यात आलेले घरघुती वीज जोडणीही देण्यात आलेली नाही. अपवादात्मक स्थितीत किंवा नैसर्गिक आपत्तीक कालावधीत विलंबाचा विचार करता येणे शक्य आहे आणि अन्य कोणत्याही स्थितीत जोडणी बाबत सबळ कारणाशिवाय होणारा विलंब कायद्यातील तरतुदीनुसारच समर्थनिय ठरु शकत नाही. वीज विधेयक २००३ मधील कलम ४३ मधील तरतुदी तसेच नियामक आयोगाच्या ELECTRICITY SUPPLY CODE आणि OTHER CONDITION OF SUPPLY मधील नियमावली क्र.४ आणि नियमावली क्र.५ मधील तरतुदी या तक्रार प्रकरणाला लागू होत असून यातील तरतुदीचा भंग महावितरणकडून झालेला आहे. अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष हया यंत्रणेने आयोगाच्या नियमावलीनुसार काम करणे अपेक्षित आहे आणि वीज जोडणी विहीत कालावधीत देता न आल्याबंद्दल सबंधित संगमेश्वर कार्यालयाने ग्राहकाला अंतर्गत कक्षाबाबत मार्गदर्शन करणे जरुरीचे होते. दिड वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतर तक्रार मंचाकडे दाखल झालेली आहे आणि आयोगाने दिलेल्या प्रॅक्टीकल डायरेक्शन नुसार नियमावली २१ अंतर्गत ३१ ऑक्टोबर २००५ रोजी परिपत्रक काढण्यात आले असून, परिपत्रकातील पॅरा क्र.१.१ आणि १.२ नुसार १२ महीन्याहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या कोणत्याही तक्रारी मंचाच्या अधिकार क्षेत्रात येवू शकतात. महावितरणने याबाबतीत उपस्थित केलेली हरकत गैरलागू असून अशा नियमावलीचे कोणतेही उल्लंघन ग्राहकाकडून झालेले नाही. तांत्रिक बाबीचा हा आक्षेप वस्तुस्थितीशी सुसंगत नसुन केवळ दिशाभुल करणारा असून तो फेटाळणेच उचित होईल. महावितरणने प्रत्यक्ष साईटवरील स्थितीच्या आधारे ऑक्टोबर अखेरपर्यंत वीज जोडणी देता येणे शक्य असल्याचे नमुद केले आहे. अंदाजपत्रक मंजुर करतानाच मटेरिअल व अनुषंगिक बाबीचा विचार करणे अपेक्षित आहे. तसेच जोडणी बाबतची वस्तुस्थिती ग्राहकाला कळविणे बंधनकारक आहे. वीज हे सेवा क्षेत्र असल्याने ग्राहकाचे महत्व अधोरेखित होणे गरजेचे आहे. महावितरणने दाखल केलेल्या म्हणण्यानुसारच १५ ऑक्टोबर पर्यंत वीज जोडणी देणे शक्य असल्याने या कालावधीतच ती ग्राहकाला देण्यात यावी. कृतीमानकाचे अपयश जरी स्पष्ट असले तरी ग्राहक भरपाई मागू इच्छित नाही तथापी अर्ज दाखल केल्यापासून विलंबाचा कालावधी आणि अनुषंगिक बाबीबद्दल ग्राहकाला रु.३५०/-( रु.तीनशे पन्नांस मात्र) देणे नियमानुसार योग्य आहे. तक्रार प्रकरणातील वस्तुस्थिती आणि तपशिलाच्या आधारे मंचाने जो निष्कर्ष दिलेला आहे त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत असून त्याची विहीत कालावधीतील कार्यवाही महावितरणवर बंधनकारक राहील.*

# आदेश

१. ग्राहकाने मागणी केल्यानुसार सर्व्हे आणि घर नं.१६७/१, मु.पो.परचुरी, ता.संगमेश्वर या ठिकाणी मंजुरीनुसार शेतीघराला घरघुती वीज जोडणी २० ऑक्टोबर पर्यंत देण्यात येवून वीज पुरवठा सुरु करण्यात यावा. विहीत कालावधीत वीज जोडणी न दिली गेल्यास २० ऑक्टोबरपासूनच्या पुढील प्रत्येक आठवडयाला रु.१००/- (रु.शंभर मात्र) प्रमाणे भरपाई देणे महावितरणवर बंधनकारक राहील.
२. महावितरणने दाखल केलेल्या हरकती, आक्षेप वस्तुस्थितीशी सुसंगत नसल्याने त्या फेटाळण्यात येत आहेत.
३. तक्रार प्रकरणातील दिरंगाई आणि अनुषंगिक बाबीबद्दल ग्राहकाला खर्चापोटी रु.३५०/- (रु.तीनशे पन्नास) वीज जोडणी दिल्यानंतर १० दिवसात देण्यात यावा आणि विलंब झाल्यास सदरहु रकमेवर ८ % दराने व्याज भरपाई देण्यात यावी.
४. आदेशाची कार्यवाही आणि पुर्तता अहवाल १५ नोव्हेंबर पर्यंत मंचाकडे दाखल करणे महावितरणवर बंधनकारक राहील.
५. या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.

पत्ता :-

सचिव,<br>
लोकपाल महाराष्ट्र राज्य विदयुत नियामक आयोग<br>
६०६/६०८, केशवा बिल्डींग,<br>
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.<br>
फोन नं. ०२२ / २६५९२९६५

| डी. एस्. जामखेडकर | व्हि.बी.जगताप | एन्.ए.कुलकर्णी |
|---|---|---|
| अध्यक्ष | कार्यकारी अभियंता व सचिव | सदस्य |
| ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल |

दिनांक :- ०४.०८.२०११<br>
ठिकाण :- रत्नागिरी.